**नि.फौ.ख.क्र.२५७/२०१९**
**निशाणी क्र.५०**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.४, नेवासा, जि.अहमदनगर यांचे न्यायालयात**

**: दो षा रो प :**

मी, लीना अ. काळे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नेवासा तुमचेवर दोषारोप ठेवत आहे की,

१. **बाळासाहेब भीमराज कर्जुले (मयत)**

२. **सोमनाथ मारूती आदिक,**
वय: २६ वर्षे, धंदा – मजुरी,

३. **शंकर मारूती आदिक,**
वय: २८ वर्षे, धंदा– शेती,

४. **सविता बाळासाहेब कर्जुले,**
वय: ३५ वर्षे, धंदा–घरकाम व शेती,

५. **मिना उर्फ मनिषा मारूती आदिक,**
वय: २३ वर्षे, धंदा–घरकाम व शेती,

६. **लिला उर्फ ललिता मारूती आदिक (मयत)**

७. **ताराबाई मारूती आदिक,**
वय: ६५ वर्षे, धंदा – घरकाम व शेती,
सर्व रा.कांगोणी, ता.नेवासा, अहमदनगर.

दिनांक १९.०१.२०१९ रोजी सायंकाळी ०४.०० वाजण्याच्या सुमारास मौजे कांगोणी गावच्या शिवारात फिर्यादीचे राहते घरासमोर फिर्यादीने आरोपींना काटेरी फांद्या टाकल्याचे कारण विचारल्याचा राग येउन तुम्ही आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना जिवे ठार मारण्याची धमकी देण्याच्या समान उद्दीष्टाकरीता बेकायदेशीर जमावाचे घटक बनले आणि त्याद्वारे **भारतीय दंड संहिताचे कलम १४३ सह १४९** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला व तो माझ्या दखलपात्रेत आहे.

२. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी समान उद्दीष्ट पुर्ततेकरीता गैरकायद्याची मंडळी जमवुन दंगा केला आणि त्याद्वारे **भारतीय दंड संहिताचे कलम १४७ सह १४९** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला व तो माझ्या दखलपात्रेत आहे.

३. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी समान उद्दीष्टाने सार्वजनीक शांततेचा भंग होईल याची जाणीव असताना देखील फिर्यादीस घाणघाण

शिवीगाळ करुन, सार्वजनिक शांततेचा भंग करण्याच्या उद्देशाने प्रक्षोभित केले व **भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम १४९** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला व तो माझ्या दखलपात्रेत आहे.

४. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी बेकायदेशीर जमावाचे सभासद बनून फिर्यादीस म्हणाले की, तुम्ही तुमचे शेतावर यायचे नाही व तुमचे वाटेकरू येथुन काढुन टाका व आमची शेती करू असे म्हणुन तुम्ही शेती कशी करता अशी धमकी दिली व **भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम १४९** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला व तो माझ्या दखलपात्रेत आहे.

५. उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन एकत्र येवुन आरोपी क्र.१ याच्या हातात तलवार, आरोपी क्र. २ याच्या हातात लोखंडी रॉड, आरोपी क्र.३ च्या हातात कोयता, आरोपी क्र.४ हिच्या हातात लाकडी दांडा, आरोपी क्र.५ च्या हातात विटकरीचे तुकडे, आरोपी क्र.६ हिच्या हातात काठी आणि आरोपी क्र.७ हिच्या हातात कु—हाड इ. हत्यारे जवळ बाळगली व त्याद्वारे **आर्म ॲक्ट कलम ३/२५** प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला व तो माझ्या दखलपात्रेत आहे.

आणि तो माझ्या दखल पात्रेत आहे. सबब,याद्वारे मी असे निदेर्शित करते की, उपरोक्त दोषारोपानुसार तुमचेवर खटला चालेल.

सही/—

**(लीना अ. काळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.४, <u>नेवासा.</u>

दिनांक : २७.११.२०२५

**<u>: प्रमाणपत्र :</u>**

दोषारोपातील मजकुर आरोपी यांना त्यांस समजणा—या मराठी भाषेत वाचून व स्पष्ट करून सांगणेत आला.

सही/—

**(लीना अ. काळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.४, नेवासा.

दिनांक : २७.११.२०२५